सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई या कार्यालयाकरिता ३ काल्पनिक पदे शिपाई (गट-ड) संवर्गात निर्माण करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र.सवअ-१३१७/प्र.क्र.१४४/१७/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,
दिनांक : २३ जुलै, २०१९

<u>**संदर्भ :**</u>- १) सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई यांचे क्र.जा.क्र./आ.शा/१६१३४/२०१७, दि.१३.०९.२०१७ चे पत्र.
२) वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि.९.६.२०१७
३) विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१००६/६०१/प्र.क्र.९५/का.८, दि.१५.०२.२००७

प्रस्तावना :-

विधि व न्याय विभागाच्या अधिपत्याखालील सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई या कार्यालयास दि.१५.०२.२००७ च्या आकृतिबंध मंजुरीबाबतच्या शासननिर्णयानुसार शिपाई संवर्गाची एकुण २२ पदे मंजूर असुन, सद्यःस्थितीत १६ पदे कार्यरत असून , ६ पदे रिक्त आहेत. याबाबत क्र.१ येथील दि.१३.०९.२०१७ च्या पत्रान्वये उक्त कार्यालयाकडुन ६ शिपायांची पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.

२. सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई हे कार्यालय मा. उच्च न्यायालयाच्या कामकाजाशी संलग्न असल्याने, मा. उच्च न्यायालयाचे कामकाज पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा न्यायालयाचे ताशेरे ओढवून घ्यावे लागतात किंवा कधी कधी दंडही सोसावा लागतो. शिपाई संवर्गाच्या कमतरतेमुळे कार्यालयाच्या कामकाजावर विपरित परिणाम होतो. सदर बाब विचारात घेऊन, शिपाई संवर्गातील ६ रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यासंदर्भातील प्रस्तावांची छाननी करण्यासंदर्भातील उक्त अ.क्र.२ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उप समितीने दि.०६.०६.२०१९ रोजी पार पडलेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार सरकारी वकीलांचे कार्यालय, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई या कार्यालयासाठी शिपाई संवर्गातील ३ रिक्त पदे बाहययंत्रणेद्वारे भरण्याकरिता ३ काल्पनिक पदे (खालीलप्रमाणे दर्शविलेल्या तपशीलानुसार) निर्माण करुन ती नियमित स्वरुपात/बाहययंत्रणेद्वारे भरण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

कार्यालयाचे नांव	पदनाम	नव्याने निर्माण करुन भरण्याकरिता मंजूर काल्पनिक पदांची संख्या	वेतनश्रेणी/मानधन
सरकारी वकील, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई	शिपाई	०३ (बाहय यंत्रणेद्वारे भरण्याकरिता)	वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दि.०२.१२.२०१३ मधील सूचना क्र.३ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

३. उपरोक्त पदावर होणारा खर्च "मागणी क्र.जे-१, २०१४, न्यायदान (दत्तमत), ११४ (००) (०१), विधी सल्लागार व समुपदेशी (शहर अधिकारी), १३ कार्यालयीन खर्च " (संकेतांक क्रमांक २०१४ ०२९९) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे पत्र क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.४५/आपुक, दि.१२.०६.२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२३१६५८०१७७१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Shweta Shrikrishna Sawant

Digitally signed by Shweta Shrikrishna Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b3ca42e7e8a1e79d299641a8dd9af497a49877ed8adb4f6fa50732d337966b34, serialNumber=0a9b2187e527bdef2e336ce0dcbf5940891b24b7bc13811ba26ac1ede1c2f1c6, cn=Shweta Shrikrishna Sawant
Date: 2019.07.23 17:07:49 +05'30'

(श्वेता सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहायक.
२) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग यांचे स्वीय सहायक.
३) प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक.
४) सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) सरकारी वकील, अपिल शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
६) महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१,मुंबई.
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
९) वित्त विभाग/व्यय-५/आपुक), मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती/का.८